मोज्यांच्या बदल्यात खाणे

लेखन व चित्रः जैक कैन्ट

मराठी: अश्विनी बर्वे

मोज्यांच्या बदल्यात खाणे

लेखन व चित्रः जैक कैन्ट

मराठी: अश्विनी बर्वे

खूप पूर्वी खूप दूरच्या ठिकाणी एक म्हातारे आजोबा आणि आजी राहत होते.

ते खूप गरीब होते.

त्यांच्याजवळ एक मोडकेतोडके घर होते आणि त्यांच्याजवळ सलगमच्या कंदाची छोटी बाग होती.

एक दिवस आजोबा आजीला म्हणाले, “माणूस एकच एक गोष्ट म्हणजे सलगम खाऊन कंटाळतो.”

त्यांच्या घराजवळ एक शेतकरी दांपत्य राहत होते, त्यांच्याकडे एक गाय होती. आजोबा आणि आजी त्या गायीकडे बघत आणि दुधाचे आणि पनीरचे स्वप्ने बघत.



''कदाचित ते आपल्याला थोडंफार विकतील," आजोबा म्हणाले.

"पण आपल्याकडे पैसे तर नाहीत," आजींनी आठवण दिली.

''एखाद्यावेळेस आपण एखाद्या गोष्टीच्या बदल्यात त्यांच्याकडून दूध आणी पनीर घेऊ शकू," आजोबा म्हणाले.

“हे होऊ शकते,” आजी म्हणाली. त्या दोघांनी आपल्या संपूर्ण घरात शोधले की त्यांना अदलाबदली करण्यासाठी एखादी वस्तू सापडते का? त्यांना फक्त एकच वस्तू सापडली जी फाटकी तुटकी नव्हती. ती वस्तू म्हणजे मोज्यांची एक जोडी.

आजोबा मोजे घेऊन त्या शेतकऱ्याकडे गेला, ज्याच्याकडे गाय होती.

काहीवेळातच तो आनंदाने
एक बादली दूध आणि
पनीरचा एक छोटा तुकडा
घेऊन घरी आला.

"व्वा! हे तर स्वादिष्ट आहे,"
आजी म्हणाली.



थोड्यावेळ झाला नाही तोच त्यांना वाटले की जर त्यांच्याकडे अदलाबदलीसाठी अजून काही असते तर! अजून मोजे तर नव्हते त्यांच्याकडे.

“मी मोज्यांची एक जोडी विणते,” आजी म्हणाली.

म्हणून तिने आजोबांच्या स्वेटरचा एक तुकडा उसवला आणि त्यापासून मोज्यांची एक जोडी विणली.

पण आजीकडे लोकर पण नव्हती.

मग त्यांनी परत बदलाबदली केली आणि दूध आणि पनीर आणले.



आधीसारखेच त्यांनी पोटभर खाल्ले-पिल्ले.

जेव्हा ते सगळे संपले तेव्हा आजीने अजून एक मोज्यांची जोडी विणली.

एकदा परत आजोबांना मोज्याच्या बदल्यात दूध आणी पनीर मिळाले.

लाजवाब!



जेव्हा दूध आणि पनीर संपले तेव्हा आजी परत मोजे विणायला बसली.

पण यावेळी फक्त एकच मोजा ती विणू
शकली,कारण तेवढीच लोकर होती.

''एका मोज्याने काय फायदा होणार?"
आजी म्हणाली, "या बदल्यात ते थोडेच
दूध आणि पनीर देतील?"

“बघू या,” आजोबा म्हणाले. ते
मोजा घेऊन शेतकऱ्याकडे गेले.

“यावेळी माझ्याकडे फक्त एकच मोजा आहे,”
ते म्हणाले.
“तुम्ही याच्याबद्ल्यात अर्धी बादली दूध आणि अर्धे
पनीर द्याल का?”

‘‘अरे काही हरकत नाही,”
शेतकऱ्याने उत्तर दिले.



‘‘गोष्ट अशी आहे की मला एकाच मोज्याची गरज आहे,”
शेतकऱ्याची बायको म्हणाली.

ती आपल्या पतीसाठी ख्रिसमससाठी एक स्वेटर विणत होती, आणि त्यासाठी थोडी लोकर कमी पडत होती, ती लोकर तिने मोजा उसवून मिळवली. तिला स्वेटर पूर्ण करण्यासाठी एका मोज्याला पुरेल तेवढी लोकर लागणार होती.

पण ते स्वेटर तिच्या पतीला झाले नाही.

म्हणून शेतकऱ्याचे बायकोने ते स्वेटर आजोबांना दिले कारण तिने बघितले की आजोबांकडे स्वेटर नाही.



आजोबांना स्वेटर बरोबर झाले.